दुरध्वनी क्र. ०२३१-२३२४२१९

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
# कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह, कळंबा, कोल्हापूर-४१६००७
ई-मेल- kolhapurcp_mh@gov.in

जा.क्र./कोमका/शेती/ /दरपत्रक मागणी/२३०९/२०२४,कळंबा, कोल्हापूर दि.२५/०४/२०२४.

**विषय :-कारागृह शेती विभागाकरीता जनावरांसाठी आवश्यक पशूखाद्य (गहूभस्सा,गोळी खाद्य, मिनरल मिक्सचर) यांचे दरपत्रक सादर करणे बाबत.**

**संदर्भ:- महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग निर्णय क्र .भाखस२०१४/प्र.क्र ८२/भाग-३/उद्योग-४ दिनांक-०१/१२/२०१६**

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, जिल्हा खुले कारागृह कोल्हापूर शेती विभागासाठी सन २०२४-२०२५ या वितिय वर्षा करीता खालील प्रमाणे कारागृह शेती विभागाकरीता जनावरांसाठी आवश्यक पशूखाद्य (गहूभस्सा,गोळी खाद्य, मिनरल मिक्सचर) इतर साहित्य/वस्तू पुरवठा करण्याकरीता खुल्या बाजारातून दरपत्रक मागविण्यात येत आहे.सर्व वस्तू व माल/साहित्य कारागृहाच्या मेनगेट पर्यंत पोहच कराव्या लागतील. खाली नमूद अटी व शर्तीसह तसेच सर्व करासहीतचे दरत्रक सिलबंद लिफाप्यावर (शेती विभागातील जनावरांचे पशुखाद्य पुरवठयाचे दरपत्रक)असे नमूद करून अधीक्षक,कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह,कळंबा यांच्या नावे दरपत्रक पेटीमध्ये जमा करावे. सिलबंद लिफाफ्यामध्ये नसलेले दरपत्रक ग्राहय धरले जाणार नाही. याची नोंद घ्यावी. दरपत्रक उघडण्याचे वेळी आपण स्वत: किंवा आपला प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल.सदर दरत्रक मागणीपत्र कारागृहाच्या संकेत स्थळावर सुध्दा उपलब्ध आहे(www.mahaprison.gov.in)

| अ.क्र | वस्तुचे नांव | ब्रँड | परिमाण | दर |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | **पशूखाद्य** | | | |
| १. | गहुभुस्सा | | ४४ किलो | |
| २. | गोळी खाद्य | | ५०किलो | |
| ३. | मिनरल मिस्चर | | १किलो | |
| | | | | |
| | | | | |

| | |
|---|---|
| दरपत्रक सादर करण्याचे ठिकाण- | कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह, कळंबा |
| दरपत्रक सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दि.०२/०५/२०२४ ......सायं.०५:०० पर्यंत. |
| दरपत्रक उघडण्याचा दिनांक | दि. ०३/०५/२०२४ .......सायं.०५:००पर्यंत. |

(नमूद दिनांकामध्ये प्रशासकीय सोईनुसार बदल होऊ शकतो.)

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील :**

01.दरपत्रकातील दर व पुरवठा आर्थिक वर्षापर्यंत व अधीक्षकांच्या वित्तीय मर्यादेतील रकमेच्या परिणामापर्यंत वैद्य राहतील.

02.दरपत्रकामध्ये कोणतीही खाडाखोड, गिरवागिरव अथवा व्हाईट इंकचा वापर करता येणार नाही.

03.दरपत्रक विहीत नमुन्यातील आपले लेटरपॅडमध्ये असावेत.

04.कोणत्याही कारणाशिवाय एखादे दरपत्रक किंवा पूर्ण दरपत्रक स्विकारणे तसेच रद्द करण्याबाबतचे सर्व अधिकार या कार्यालयाने राखून ठेवले आहेत.

05. कच्च्या मालाचा खरेदी/पुरवठा आदेशपत्र मिळाल्याच्या दिनांकापासून सात (7) दिवसांच्या आत कारागृह गोदामापर्यंत स्वखर्चाने करावा लागेल. दिलेल्या मुदतीमध्येच माल पुरवठा न केल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता खरेदी पुरवठा आदेश रद्द करण्याचे अधिकार या कार्यालयास राहतील.

06.पुरवठा केलेला माल दिलेल्या विनिर्देशाप्रमाणे व मानक गुणवत्तेप्रमाणे (Standard Quality) नसल्यास दोषयुक्त असल्यास तो स्व:खर्चाने परत घेऊन जावा लागेल व विहीत कालावधीत नव्याने मालाचा पुरवठा करावा लागेल.

07.दरपत्रकामध्ये या कार्यालयाच्या मागणीपत्राचा संदर्भ क्रमांक व दिनांक व पुरवठादार संस्थेचा GST क्रमांक नमूद असणे आवश्यक राहील.

08. दरपत्रकासोबत महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम 1948 अंतर्गत वैध नोंदणी प्रमाणपत्राची स्वंय साक्षांकित छायांकित प्रत जोडणे बंधनकारक आहे. पुरवठाधारकाचे/ संस्थेच्या PAN Card व GST registration ची स्वयंसाक्षाकित छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. दरपत्रका सोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये एकल निविदा/दरपत्रक देण्याबाबत विक्रेते/दरपत्रक धारकाचे हमीपत्र व पॅनकार्डची तसेच जीएसटी अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडणे अनिवार्य राहील. (सोबत हमी पत्राचा नमुना जोडलेला आहे.)

09. उपरोक्त नमूद वार्षिक परिमाण हे अंदाजित असून त्यामध्ये आवश्यकतेनुसार बदल होईल.वरील सर्व अटी व शर्तीची पूर्तता न केल्यास आपले दरपत्रक रद्द समजण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

**सोबत** : हमीपत्राचा नमुना.

**आपला विश्वासू**

**( शामकांत शेडगे )**
**अधीक्षक**
**कोल्हापुर मध्यवर्ती कारागृह,**
**कळंबा,कोल्हापूर**

**प्रति,**

..................................... ,

.....................................,

.....................................